**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज


RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ३५ वा ● शुक्रवार २१ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 35 | Date : 21/06/2024 blow Friday Page 4 Price 4

## २१ जुन योग दिवस-योगाचे महत्त्व



गेल्या २६ वर्षापासुन डायबेटीस आहे सुरुवातील शुगर २६० होती मात्र योगा प्राणायम करण्यास सुरुवात केल्यानंतर रक्तातील साखरेचे प्रमाण पहिल्या तीन महिन्यात २०० झाले नंतरच्या तीन महिन्यात १५० झाले एक वर्षाच्या आत दोनही गोळ्या बंद होऊन २५ वर्षा पासुन रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित असुन गोळ्या बंद आहे दररोज ७ कि.मी. चालणे व १ तास योगा प्राणायम नियमित आहे .

२१ जून हा दिवस देशभरात जागतिक योग दिन म्हणून साजरा केला जातो. योगामुळे शारीरिक स्वास्थ्य, मानसिक संतुलन आणि आत्मिक शांती मिळते. योग हे प्राचीनशास्त्र असून भारतीय परंपरेस लाभलेली ती एक समृद्ध देणगी आहे असे म्हणता येईल. नियमित योगामुळे शरीराबरोबरच व्यक्तीचे मानसिक, बौद्धिक, भावनिक गुणांचा उत्तम प्रकारे विकास होत जातो. त्यामुळे दररोज नियमित व्यायाम केला पाहिजे. योगाभ्यास हा सरावानेच प्राप्त होतो. योगाद्वारे हे गुण विकसित होण्यासाठी योगाची आठ अंगे किंवा घटक जाणून घेणे व त्यानुसार वर्तन ठेवणे आवश्यक असते. योगाची आठ अंगे पुढील प्रमाणे आहेत. यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी हे आहेत. योगासनामुळे होणारे फायदे पुढील प्रमाणे सांगता येतील.

**१)जीवन विषयक दृष्टिकोन बदलतो, सकारात्मकता येते. २)अवयवांची कार्यक्षमता वाढते. ३)रोगप्रतिकारक शक्ती वाढते. ४)श्र्वसन संस्था व्यवस्थित होऊन प्राणवायूचा पुरवठा अधिक होतो. ५)कामाचा उत्साह वाढतो व थकवा येत नाही . ६) कार्यक्षमता वाढते. ७) पाठीचा कणा लवचिक बनतो. ८) मनाला शांतता मिळाल्याने प्रसन्नता वाढते. ९) मन केंद्रित करण्याची क्षमता वाढते.**

प्राणायाम केल्यामुळे आकुंचन, प्रसरण होण्याची क्षमता वाढते. रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. त्यामुळे शरीर व मेंदूला ऑक्सिजन युक्त रक्ताचा भरपूर पुरवठा होतो. कार्यक्षमता वाढलेली दिसून येते. बंध या प्रक्रियेत शरीरातील एखाद्या भागावर नियंत्रण आणणे. श्र्वसनक्रियेवर नियंत्रण आणण्याचा हा महत्त्वाचा प्रकार असून योग प्रक्रियांमध्ये ही अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. उत्तम शरीर व मानसिक स्वास्थ्य हे परस्परांवर अवलंबून असते. निरोगी जीवनाचा भरपूर आनंद घेण्यासाठी योग ही परिपूर्ण जीवन पद्धती आहे असे म्हणता येईल. शरीराचा विकास, कार्यक्षमता विकसित करण्यासाठी नियमित व्यायाम करणे फार आवश्यक आहे.

**–एस बी. देशमुख**

# जम्मूकाश्मीरमध्ये लवकरच विधानसभा निवडणूक; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ग्वाही

**जम्मू / दैनिक यशसिध्दि न्यूज**

जम्मू आणि काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे आणि जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशालाही राज्याचा दर्जा परत मिळेल, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी सांगितले. श्रीनगरमध्ये दीड हजार कोटी रुपयांच्या ८४ विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केल्यानंतर एका कार्यक्रमाला संबोधित करताना पंतप्रधान बोलत होते. ते म्हणाले की केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशात नुकतेच झालेले दहशतवादी हल्ले गांभीर्याने घेतले आहेत आणि जम्मू-काश्मीरच्या शत्रूंना चोख प्रत्युत्तर दिले जाईल.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात मतदान झाल्याबद्दल त्यांनी जम्मू आणि काश्मीरमधील तरुणांचे कौतुक केले आणि लोकशाहीचा विजय निश्र्चित असल्याचे ते म्हणाले. ऑगस्ट २०१९ मध्ये रद्द करण्यात आलेल्या अनुच्छेद ३७० नंतर जम्मू आणि काश्मीरला विकासाची फळे चाखायला मिळाली. आज भारतीय संविधान खऱ्या अर्थाने जम्मू-काश्मीरमध्ये लागू झाले आहे, असे ते म्हणाले. 'केंद्राने अलीकडील दहशतवादी



हल्ले अतिशय गांभीर्याने घेतले आहेत. गृहमंत्र्यांनी एक बैठक घेतली आणि संपूर्ण यंत्रणेचा आढावा घेतला. मी खात्री देऊ इच्छितो की आम्ही जम्मू-काश्मीरच्या शत्रूंना शिक्षा देण्यात कोणतीही कसर सोडणार नाही,' ते म्हणाले.

जम्मू-काश्मीरमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होईल, असे आश्र्वासन मोदींनी जनतेला दिले. ते म्हणाले, "शांतता आणि मानवतेच्या शत्रूंना जम्मू-काश्मीरची प्रगती आवडत नाही. आज ते जम्मू-काश्मीरचा विकास रोखण्याचा शेवटचा प्रयत्न करत आहेत," ते म्हणाले. दोन दिवसांच्या दौऱ्यावर आलेले मोदी शुक्रवारी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. कार्यक्रमादरम्यान, पंतप्रधान मोदींनी जम्मू-काश्मीरमध्ये सरकारी नोकऱ्यांसाठी २००० हून अधिक लोकांना नियुक्ती पत्रांचे वाटप केले. मोदी म्हणाले की, आज जम्मू-काश्मीरमध्ये विकासाच्या प्रत्येक आघाडीवर मोठ्या प्रमाणावर काम केले जात आहे आणि त्याअंतर्गत हजारो किलोमीटरचे नवीन रस्ते बांधले गेले आहेत, काश्मीर खोरेही रेल्वेने जोडले जात आहे. चिनाब नदीवर बांधण्यात आलेल्या जगातील सर्वात मोठ्या रेल्वे पुलाचा संदर्भ देत मोदी म्हणाले की, त्याची छायाचित्रे पाहिल्यानंतर प्रत्येक भारतीयाचा अभिमान भरून येतो.

## बिहारमधील वाढीव आरक्षण रद्द;

### नितीश सरकारला धक्का

**पाटणा / दैनिक यशसिध्दि न्यूज**

बिहारमध्ये दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींच्या आरक्षणात ५० टक्क्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत वाढ करण्याचा नितीश कुमार सरकारचा गतवर्षीचा निर्णय पाटणा उच्च न्यायालयाने गुरुवारी रद्दबातल ठरविला. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निकालांनुसार कोणत्याही परिस्थितीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जाऊ शकत नाही, हा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद उच्च न्यायालयाने मान्य केला. गतवर्षी नोव्हेंबरमध्ये नितीश कुमार सरकारने विधेयक विधानसभेत मंजूर करून घेत आरक्षणाची मर्यादा ६५ टक्के करण्याचा शासन आदेश काढला होता.



। पान २ वर

# वाढवण बंदर उभारणीस केंद्र शासनाची मंजुरी: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळाचे मंत्री संजय बनसोडे यांनी मानले आभार

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्यातील वाढवण (जि. पालघर) बंदर उभारणी करण्यास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. राज्याच्या विकासासाठी ही अत्यंत महत्त्वाची बाब असून यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे राज्याचे बंदरे विकास मंत्री संजय बनसोडे यांनी आभार मानले आहेत.

जगातील १० मोठ्या बंदरापैकी देशातील वाढवण हे एकमेव मोठे बंदर असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. त्यातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होणार आहेत. सुमारे १२ लाख रोजगार निर्मिती होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त मंत्री श्री. बनसोडे यांनी व्यक्त केली. वाढवण परिसरामध्ये राहणाऱ्या स्थानिक लोकांना, मत्स्यव्यवसाय करणारे व या व्यवसायाशी संबंधित सर्व घटकांचे पुनर्वसन तसेच योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त कौशल्य विकास कार्यक्रम राबवून रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे. वाढवण बंदरामुळे राज्याचा तसेच स्थानिक नागरिकांच्या आर्थिक विकासाचे नवीन दालन खुले होणार असल्याचे मंत्री श्री. बनसोडे यांनी सांगितले. वाढवण बंदर हे जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (जे.एन.पी.टी.) व महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त भागिदारीतून होणार आहे. या बंदर प्रकल्पाची किंमत ७६ हजार २०० कोटी रुपये आहे. यामध्ये केंद्र व राज्य



शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७४ व २६ टक्के आहे. वाढवण बंदराची उभारणी करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचेही मंत्री श्री. बनसोडे यांनी सांगितले.

## आमदारांच्या शिफारशीची गरज नाही; प्रणिती शिंदेनी अधिकाऱ्यांना सुनावलं

**सोलापूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

गाव पातळीवरील झेडपीच्या विकास निधी वाटपाला आमदारांच्या शिफारशींची गरज नाही. असे स्पष्ट मत मांडत खासदार प्रणिती शिंदे यांनी अधिकाऱ्यांना सुनवले आहे. गुरुवारी खासदार प्रणिती शिंदे यांनी झेडपीची आढावा बैठक घेतली. बैठकी




दरम्यान, दलित वस्ती, शाळा दुरूस्ती, जलजीवन, पाणीपुरवठा, जनसुविधा, नागरी सुविधा, अथवा सेस फंड निधी वाटपासाठी आमदारांच्या शिफारशीची गरज नाही, असं शिंदेंनी सांगितलं ग्रामपंचायतीच्या ठरावा नुसार लोकसंख्या निहाय निधी वाटप करण्यात यावा. आमदारांची शिफारस बंधनकारक असल्याचे भासविल्यामूळे अनेक गावे विकासापासून वंचीत राहत आहेत. आमदारांच्या शिफारसशिवाय गावाला निधी मिळणार नाही, असा शासन निर्णय आहे का ? असा सवाल प्रणिती शिंदे यांनी उपस्थित करताचं अधिकाऱ्यांची भंबेरी उडाली.तात्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आमदारांच्या शिफारशी शिवाय निधी देऊ नका, असे झेडपी अधिकाऱ्याना सुचित केले होते. तीचं रिघ विद्यमान पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ओढली.

खासदार शिंदे यांनी दिलेल्या सुचनाचे पालन होणार का? हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे. आढावा बैठक प्रसंगी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, सुरेश हसापुरे, यांच्यासह सीईओ मनीषा आव्हाळे, एडीशनल सीईओ संदीप कोहीनकर, विभागप्रमुख उपस्थित होते.

### १८९ कामांचे बिले निघणार

**जलजीवन मिशन पाणी पुरवठा विभागाच्या १८९ कामांचे बिले आठवडा भरात ठेकेदारांना मिळणार आहेत. १८९ कामावरून मोठा गदारोळ उडाला होता. या कामांवर चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली होती. हा मुद्धा उपस्थित होताचं सीईओ मनीषा आव्हाळे यांनी आठ दिवसात बिले काढण्याचे आश्र्वासन दिल्याची माहीती सुरेश हसापुरे यांनी दिली.**

## अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण न ठेवणे अधिकाऱ्यांना भवणार

### लोकायुक्त मुंबई यानी शासनाच्या महसूल विभागस दिले चौकशीचे आदेश

**बुलढाणा/ राहुल साबळे**

देऊळगाव ताजा : तालुक्यातील खडकपूर्णा नदी पात्रातून शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने अवैध गौण खनिज उत्खनन वाहतुकीच्या अनुषंगाने महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्र्चित करून त्यांच्यावर प्रशासकीय व फौजदारी कारवाई करण्यात यावी अशा तक्रारीनंतर ही प्रशासनाकडून कार्यवाही जाणून बुजून विलंब होत असल्याची तक्रार महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त चंद्रकांत खरात यांनी लोकायुक्त मुंबई यांच्याकडे केली होती. प्रस्तुत प्रकरणांची गंभीर दखल घेत सदर प्रकरणात महसूल उपायुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय चौकशीचे



आदेश दिले आहे. सिंदखेडराजा उपविभागात खडकपूर्णा नदी पात्रात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक ही अधिकारी कर्मचारी व वाळू माफिया यांच्यातील संगनमताने होत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करून त्यांच्यावर वाळू प्रकरणी संबंधित दोषी महसूल अधिकारी व कर्मचारी, खानिकर्म विभाग अधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई प्रस्तावित करा अशी मागणी महाराष्ट्र शासन युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केली होती. सदर प्रकरणाची दखल घेत महसूल उपायुक्त अमरावती संजय पवार यांच्या कडे बुलढाणा जिल्हाधिकारी यांनी २५ सप्टेंबर २०२३ रोजी एका पत्राद्वारे तत्कालीन तहसीलदार श्याम धनमने, नायब तहसीलदार विकास राणे, तत्कालीन मंडळ अधिकारी पी.पी वानखडे, एन एल वायडे, तलाठी एस.डी सानप,तत्कालीन । पान २ वर

## खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर / दैनिक यशसिध्दि न्यूज**

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नवनिर्वाचित खासदार निवडून आल्यानंतर प्रथमच त्यांनी पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह भ प जळगावकर महाराज व उद्धव ठाकरे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष व मंदिर समितीचे सदस्य श्री संभाजी राजे शिंदे यांनी नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे यांचे येतोचितपणे सन्मान करून त्यांना श्री विठ्ठल रुक्मिणी ची मूर्ती देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे सदस्य ह भ प जळगावकर महाराज व उद्धव ठाकरे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष व मंदिर समितीचे सदस्य संभाजी राजे शिंदे व मंदिर समितीचे कर्मचारी इत्यादी उपस्थित होते



# संपादकीय

## लढाई जनतेला लढत..

गेल्या दहा वर्षांपासून सत्तेत असलेल्या नरेंद्र मोदींना यंदा चारशे पारची ओढ लागली होती. २०१४ मध्ये २८२, २०१९ मध्ये ३०३ आणि २०२४ मध्ये भाजपला चारशे पार खासदार पाहिजे होते. मात्र, भारतीय मतदारांनीत्यांना बहुमताच्याही जवळ फिरकू दिले नाही. नरेंद्र मोदी आणि भाजपचा हा नैतिक पराभव असल्याचे आता म्हटले जात आहे. कारण चंद्राबाबू, नितीशकुमार, शिंदे, चिराग पासवान यांना निवडणुकीच्या आधीच सोबत घेतल्यामुळे त्यांच्या खासदारांच्या बळावर एनडीएचे सरकार आले आहे. त्यामुळे हा मोदी-शहांचा पराभवच आहे. मोदींना जनतेने नाकारलेले आहे. आकड्यांच्या खेळात मोदी विजयी झाले असले तरी जनादेश  यांना मिळालेला नाही. भाजप आणि त्यांचे सहकारी पक्ष, भाजपला कमी जागा येण्यासाठी इंडिया आघाडीच्या संविधान बदलाच्या प्रचाराला जबाबदार धरत आहेत. एक खोटा नॅरेटिव्ह क्रिएट केला गेला आणि मतदारांना संभ्रमित केले गेले, असे सर्रास भाजप आणि एनडीए घटक पक्षांकडून सांगितले जात आहे. भाजप नेत्यांनी लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वीच २०२४ मध्ये चारशे पारचा नारा दिला होता. देशात कोणालाही सरकार स्थापन करायचे असेल तर २७२ खासदार असणे आवश्यक आहे. बहुमताचा हा आकडा गेल्या दोन निवडणुकांमध्ये भाजपने मिळवला होता. असे असतानाही भाजपला चारशे पार जागा का पाहिजे, याचे उत्तर मोदी सरकारमधील मंत्री अनंतकुमार हेगडे यांनी दिले होते. भाजपला त्यांचा हिंदुत्वाचा अजेंडा राबवण्यासाठी चारशे पार जागा हव्या आहेत. भूतकाळात काँग्रेस नेत्यांनी हिंदुत्वाला समोर न ठेवता भारतीय संविधान तयार केले, त्यात काही बदलही केले. आपला धर्म वाचवायचा असेल तर संविधानात बदल करायला हवा. आपल्याकडे सध्या दोन तृतीयांश बहुमत आहे. मात्र, संविधान बदलासाठी राज्यसभेतही बहुमत हवे. त्यासाठी चारशे पार जागा हव्या आहेत. संविधान बदलाचे हे थेट वक्तव्य हेगडे यांनी केले होते. त्यामुळे भाजप आणि एनडीएमधील घटक पक्षांचे नेते कितीही म्हणत असले की संविधान बचावचे नॅरेटिव्ह सेट करण्यात आले, पण त्याला सत्ताधाऱ्यांकडून वास्तवाची जोड मिळत गेल्यामुळेच जनतेने त्यांना नाकारले. संसदेत संविधानापुढे नतमस्तक होऊन संविधानाचे रक्षण होणार नाही, तर संविधानातील मूळ तत्त्वे लोक कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून जनतेच्या दारापर्यंत न्यावी लागतील. त्यासोबतच संविधानाच्या रक्षणाची लढाई जनतेला लढत राहावी लागणार आहे.

पान १ वरुन

## अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर

तलाठी एच डि दांडगे यांच्यावर अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर  कुठल्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले नसल्याचा ठपका ठेवत संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध सामूहिक विभागीय चौकशी सुरू करण्याकरिता शासनास कार्यवाहीचा प्रस्ताव सादर केला.या अहवाला वरून अवर सचिव महसूल यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर अवैध उत्खननावर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवले नसल्याने संबंधितावर सामूहिक विभागीय चौकशी सुरू करण्यात करिता स्वतंत्र दोषारोप १ ते ४ सादर केले. याचबरोबर जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्यामार्फत १ नोव्हेंबर २०२३ अन्वये तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, तत्कालीन उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे, तत्कालीन जिल्हा खनिकर्म अधिकारी व्ही पी राठोड, तत्कालीन प्रभारी जिल्हा खनीकर्म अधिकारी पि.के करे,एस एच भांबळे, यांचे विरुद्ध शिस्तभंगाचे कारवाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त कार्यालयास सादर केला. सदर प्रकरणात प्रशासकीय स्तरावर कार्यवाहीस हेतू परस्पर विलंब केला जात असल्याबाबत ची तक्रार सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत ज्ञानदेव खरात यांनी लोकायुक्त आणि शासनाच्या महसूल विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे केली व सदर प्रकरणात तात्काळ विभागीय चौकशी करून कारवाईची मागणी केली होती.

सदर प्रकरणात शासनाचे अवर सचिव महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई संजीव राणे यांनी एका आदेशाद्वारे संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना शिस्तभंग विषयक प्रकरणांमध्ये संयुक्तपणे जबाबदार धरून महाराष्ट्र शासन नागरी सेवा ( शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम १२ चा पोटनियम (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करून मुक्त सर्व शासकीय कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सामायिक विभागीय चौकशी द्वारा करण्यात येईल, संयुक्त कार्यपद्धतीच्या प्रायोजनाबाबत शासन शिस्तभंग विषयक प्राधिकारी म्हणून काम करील आणि महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील विनिर्दिष्ट केलेल्या शिक्षा लावण्यास सक्षम राहील. असे आदेश पारित केले आहे. एक वर्षापासून सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुरावा शासनाकडे सादर केलेली सक्षम कागदपत्रे या आधारावर महसूल आणि खनिकर्म अधिकारी व कर्मचाऱ्याच्या चौकशीचे आदेश पारित केले आहे.

# आंबेडकरवादी लेखक, साहित्यिक

### डॉ. दत्तात्रय गायकवाड

**चौंसष्ठ वर्षे सरताना....**

आयुष्याची ६४ वर्षे सरली..... ६५ वर्षात पदार्पण.... ६४ नॉट आउट असा स्कोअर बोर्ड झळकतो आहे.

अजूनही धावपट्टीवर.... नाबाद... आठवणी व अनुभवाची मालिका फेर धरते. खरे, माणसाने इतिहासातून जय पराजयाच्या कारणांचे संदर्भ घेऊन वाटचाल करावी लागते. आयुष्याच्या वाटचालीत चढ-उतार असतात. जीवनाचे प्रश्न संदर्भ आणि परिस्थिती बदलत राहते. भूतकाळ समजून घ्यावा लागतो. एक आहे की, माणसाला कर्तृत्व सिद्ध करून दाखवावे लागते. ओढून काढून आणता येत नाही. कष्ट करावे लागतात. अभ्यास करावा लागतो. घडावे लागते. घडवावे लागते. शिकावे लागते. चांगलं व्हायला व करायला वेळ लागतो. यासाठी आम्ही सहन केलेल्या व्यथा, वेदना, दुःख, दैन्य, दास्य, अपमान, यांना शब्दबद्ध करून वाट करून दिली. आमचे सभोवताली घडणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व धार्मिक घटनांतून जीवनाची वाटचाल चालू आहे. वैचारिक चीड, निषेधाची जाणीव, आणि काय करायला हवे यासाठी लेखन अविरत चालू आहे. निरपेक्ष, निर्लेप , निर्विकार भूमिकेची मांडणी चालू आहे. परिणामत: यावर 'भरती-ओहोटी जीवनसंघर्ष' साकार झाले. फुले आंबेडकरी साहित्याचा वैचारिक प्रवास सुरु झाला.

२. सेवानिवृत्तीनंतर म्हणजे जून २०२० ते जून २०२४ दरम्यान, एकूण सात ग्रंथ, ४८ भाषणे व सुमारे २५० पुस्तके वाचकांना भेट दिली. आंबेडकरी विचार चळवळ चालू ठेवली. ग्रंथापैकी दोन ग्रंथ प्रा. गौतम गायकवाड यांनी आमच्या साहित्यावर संपादित केली. पाच स्वलिखित पुस्तके प्रकाशित केली.

जन्मदिनादिवशी केवळ केक कापणे; मेणबत्ती विझवणे; केक तोंडाला लावणे असे न करता शांतपणे वाचन चळवळ समृद्ध करण्यासाठी आपला वाटा किती देता ....येईल यावर भर दिला

३.आंबेडकरी विचार आता देशा-प्रदेशा पुरता, जातीपुरता मर्यादित राहिला नसून तो जगभरच्या वंचितांना व शोषितांना लागू होताना दिसत आहे. यामुळेच त्याला वैश्रि्वक विचार प्रणाली बनली आहे. सामाजिक जाणीव निर्माण करणे, आत्मभान यासाठी तयार करणे, घडविणे, अन्यायाविरुद्ध उभे राहण्यासाठी सांगणे, सतत मनुष्यत्वाची स्थापना करत राहणे, नवी दिशा देणे, एक नवा आयाम निर्माण होताना दिसत आहे. बुद्ध कबीर फुले आंबेडकरांची वैश्रि्वक विचार माझ्या अभ्यासाचे आधार आहेत. यातूनच लेखनाची दिशा मिळत गेली. फुले आंबेडकरी विचार वैश्रि्वक आहेत. एकविसाव्या शतकातील आंबेडकर एक वैश्रि्वक विचारवंत म्हणून पुढे येताना दिसत आहेत. जागतिकीकरणात माणसाचे जीवन बदलत आहे. पैसा हाच मानवी जीवनाचे केंद्रस्थान बनला आहे. जगण्याची साधने कमविणे, जास्त कमाई करणे, धनसंचय करणे, श्रीमंतीची प्रदर्शन करणे, हाच माणसाचा फंडा बनला आहे. हे खर आहे.

सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करताना सार्वजनिक जीवनात मात्र अज्ञान, अनास्था, अहंकार, हीनपणा, बारीकसारीक चुका करण्याची वृत्ती, हेवेदावे, प्रचंड राजकारण याचा सामना करायला करावा लागला. हे सत्य आहे. ज्यांनी निबंध देखील नीट लिहिला नसेल, लग्नपत्रिका नीट छापली नसेल, एखाद्या गरीब विद्यार्थ्याला पेनातली रिफीलची देखील मदत केली नसेल... अशांच्याकडून अपमान, हेटाळणी व कुचेष्टाला सामोरे जावे लागले. सरकारी नोकरी असताना प्रसिद्धीची हाव नव्हती. ग्रंथालय व माहिती शास्त्र संशोधन करणे, लेखन करून पुस्तके प्रकाशित करणे, आपली भूमिका स्पष्टपणे करणे, वैयक्तिक



तंटेबखेडे, कोर्टकचेरी करणे, रात्री उशिरापर्यंत जागून लेखन करणे, सतत सत्याचा ध्यास धरणे, छोट्या छोट्या कारणावरून सत्यासाठी चिडणं, हा सर्व संघर्ष डोळ्यापुढे येतो. जिथे काम करतो तिथे अनास्था, अवहेलना अपमान वाट्याला आले. अनेक ठिकाणी आपले बरोबर असूनही तडजोड करून पुढच्याला सरळ करणे होत आले. तरीही साहित्यावर व ग्रंथावर प्रचंड प्रेमाची आस सोडली नाही. आयुष्यातला एक टप्पा पूर्ण करत हळूहळू शिखराची एक एक पायरी चढत .....प्रवास झाला. पुस्तकातून वाचनातून नेहमी योग्य दिशा मिळत गेली. वाचन, लेखन व भाषणे यात प्रचंड दंग होत गेलो. आज ६२ वर्षे कसे गेले... कळलेच नाही. जिथं बालपण गेले प्राथमिक- माध्यमिक शिक्षण झालं. त्या हायस्कूल आष्टा कासार येथे दहावी झालो. पुढील शिक्षण पुणे येथील नौरोसजी वाडिया महाविद्यालयात झाले. परिस्थिती अनुकूल नसताना सकारात्मकतेचा ध्यास घेतला. विद्यार्जन केले. आयुष्यात प्रत्येक माणसे दिशा देणारी, मदत करणारी भेटली. काही ठरवलं नव्हतं. घडत होते. घडत गेलो. बी.ए.; बिलिबआयएससी; एमलिबआयसी आणि पीएचडीचे शिखर गाठले. आयुष्यात कष्ट, परिश्रम व वेळेचा सदुपयोग करून प्रकाशाकडे धाऊ लागलो. ती धमक आपोआप येत गेली. अनेक समस्या, अडचणी, उणिवा, त्रुटी ,संकटे, अपघात दुष्काळ यांना पादाक्रांत करत यशाचा कळस शोधत राहिलो. केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र सारख्या नावाजलेल्या आंतरराष्ट्रीय संस्थेतून 'ग्रंथालय व माहिती अधिकारी' म्हणून सेवानिवृत्ती सुखावणारी घटना म्हणावी लागेल.

४.आंबेडकरी विचारनिष्ठा जपण्यासाठी, सतत वाचन व चिंतन यातून आदर्शाचा शोध घेत असायचो. माणसाच्या जीवनात स्वभाव, वर्तन आणि चिंतन हे व्यक्तिमत्वाचे महत्त्वाचे घटक असतात. विचार करताना सकारात्मकता, उपयुक्तता व आदर्श समोर ठेवून प्रवास करावा लागतो. बदलत्या परिस्थितीत आपणास टिकून राहायचे असेल तर सत्य आणि व्यवहार हातात हात घालून जायला हवे. याची कास धरत. बऱ्याच वेळी आपला प्रामाणिकपणा व स्पष्टवक्तेपणा कसा मिळतो हे दिसून आले. माझं एक चतुर्थांश आयुष्य कोर्टकचेरी करण्यात गेले. सत्याचा शोध आणि सत्य काय असते हे सांगण्यासाठी वारंवार कोर्टाच्या प्रांगणात जावे लागते. खरा हा वेळ फुकट गेला. सत्य सांगण्यासाठी देखील धाडस असावे लागते. पुरावे द्यावे लागतात. संघर्ष करावा लागतो. पाठपुरावा करावा लागतो आधार असावा लागतो वेळ द्यावा लागतो पैसा मोजावा लागतो. तेव्हा कुठे सत्यदेखील क्वचितच सापडते याचा प्रत्यय आला.

साधी जीवन वृत्ती जोपासली. वास्तव पाहत गेलो. राजकारण नाही, कोणाशी स्पर्धा नाही, त्यामुळे त्रास झाला नाही. स्वतःलाच समजावत गेलो. त्यामुळे असत्य असूनही सहन करत नाव पैलतीरावर आणली नेट व सरळमार्गी जीवन जगण्यावर भर देत गेलो. जीवनात संकटे प्रलय दुष्काळ महापौर महायुद्धे या घटना टाळणे टाळणे माणसाच्या माणसाला शक्य होत नाही आम्ही मात्र कोणत्याही संकटकाळी पुस्तकांना गुरु मानले पुस्तकांनी जगायला शिकवले सकारात्मक शैली कशी ठेवायची याचा आत्मभान निर्माण केलं. पैशाचा मोह नाही, द्रव्याचा मोहन नाही, संपत्तीची हाव नाही, जीवनाचा कार्यकारण भाव केव्हाच ओळखला होता. आपली नोकरी शिक्षण व अनुभवाने जीवन सार्थकी लावण्याची जिद्द बाळगली आपल्यासोबत समाजातील इतर सर्व घटकांना विकास व समृद्ध व्हावे यासाठी 'पे बॅक टू सोसायटी' भावना बाळगत गेलो. धम्म चळवळीकडे वळलो. सतत वाटत राहिले की सर्वांनी प्रकाशाकडे वाटचाल करावी. अंधारयात्री म्हणून प्रवास करत राहिलो. जाता जाता काही प्रकाश किरणे अंगावर आलीही. जीवन चागंले, अधिक अर्थपूर्ण, शांत, सुरक्षित सृजनशील व्हावे म्हणून माणूस धडपड करत असतो. जीवनमुल्ये घडवत असतो. त्याप्रमाने आपल्या भावनांची रसद ग्रंथरूपाने देण्याचा प्रयत्न केला. केंद्र शासनाची आचारसंहिता....नोकरी म्हणून जबाबदारी साभांळत भाषा , धर्म, संस्कती आणि समाज यातील बदलांचे निरीक्षणे नोदंवत राहिलो. मुळ विचार हा क्रांतीचे उगमस्थान असते. ही जाणिव बाळगून प्रवास करत राहिलो. आंबेडकरी विचारांचे बळ आणि धम्माभिलाषी असल्याने, आतापर्यंत प्रकाशित झालेले नवीन आवृत्त्या मिळून २१ ग्रंथ, १०० शोधनिबंध/लेख, १८० पेक्षा जास्त व्याख्याने, अनेक चर्चासत्रात, धम्मपरिषदात सहभाग घेत आलो. काहीतरी आपण समाजाचे देणे लागतो. ती परतफेड करण्यासाठी शेरपाची भुमिका करत आलो. एखाद्या गिर्यारोहकाला शेरपा वाटाड्या, व इतर रसद पुरवतो. त्याप्रमाणे विचारांचा जागर कायम धगधगता राहावा यासाठी, परिवर्तनासाठी, बदलासाठी, विचार गतिमान करण्यासाठी शब्दरूपाने रसद पुरवत गेलो.

माती नुसती पडून असते शेती करावी लागते. चागंले पीक येण्यासाठी दरवर्षी जमिनीची मशागत करावी लागते. दगड रस्त्यावर पडून असतात , त्यानां घडवावे लागते. शब्द हे शब्दकोशात निपचत पडलेले असतात, त्यानां बाहेर काढून आशयाच्या अंगाने चिरेबंद करावे लागते. कोणीतरी येवून गारगोटीवर गारगोटी घासावी लागते तेव्हा ठिणग्या पडतात. तेव्हा हात जागवावे लागते, माणूस जागवावा लागतो. त्याला ळसपरींश करावं लागतं, प्रज्वलित करावं लागतं, हक्काची व जबाबदारीची जाणिव करून द्यावी लागते. विचारदेखील स्थिर असतात त्यानां आशयानुसार रचनात्मक माडंणी करावी लागते......हेच प्रबोधनात्मक कार्य चालू ठेवले आहे.

विशेष म्हणजे, १४ ऑक्टोबर १९५६ ला बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारला. आम्ही देव नाकारला. बाबासाहेबांनी धर्म नवे धम्म दिला. एक तत्वज्ञान म्हणून बौद्ध धम्माकडे पाहायला हवे. अलीकडे बौद्धांमध्ये व्रतवैकल्ये वाढली आहेत. देव-देव वाढले आहेत. बौद्ध माणूस तीर्थक्षेत्रांना बौद्ध जाताना दिसतोय. याला छेद तर नाही ना...?

बौद्ध धम्म गतिमान व्हायला हवा. विवेकावर आधारित धर्म चळवळ निर्माण व्हावी. यासाठी पूर्वीपासूनच ठरवलं होतं की समाजाचा तळ ढवळताना.

आमचे वाचन, चिंतन आणि आंबेडकरवादी विचारनिष्ठा कामी आल्या. विद्यार्थी दशेपासूनच ठरवलं होतं की समाजाचा तळ ढवळायचा. यासाठी वर्तमानपत्रात पत्र लेखन करत असे. नोकरी करतच जाणिवा व्यक्त करणे सोपे नाही. हे कळत होते. तरीही शोध घेत राहिलो. लिहीत राहिलो. बौद्धधम्म आणि आंबेडकर या विचारांच्या राजमार्गावर चालत राहिलो. साहित्य, समाज संस्कृती आणि प्रबोधन क्षेत्रातील उजेड यात्रेत सहभागी झालो. बदलते वास्तव, विचारनिष्ठा, परिवर्तन आणि पुरोगामी विचारांची सहल करत राहिलो. प्रकट होत गेलो. विविध उपक्रम राबवले. आम्ही आंबेडकर विचार जपला, धर्म विचार जपला, नव्हे तर सांस्कृतिक मूल्ये जपली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे **क्रमश :**

## बिहारमधील वाढीव

त्या वेळी ते राष्ट्रीय जनता दलाबरोबर सत्तेत होते. तत्पूर्वी सरकारने बिहारमध्ये जातनिहाय सर्वेक्षण केले होते. या सर्वेक्षणाच्या आधारे मागास आणि अतिमागासांची टक्केवारी ६३ तर अनुसूचित जाती आणि जमातींची टक्केवारी२१ असल्याचा दावा करून आरक्षण मर्यादा वाढविण्यात आली होती. याविरोधात पाटणा उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल होत्या. याचिकांवर एकत्रित सुनावणी घेतल्यानंतर मार्चमध्ये न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. मुख्य न्यायाधीश के. विनोद चंद्रन यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने गुरुवारी हे वाढीव आरक्षण रद्द केले. इंद्रा सहानी खटल्यात आणि अलीकडे महाराष्ट्र सरकारचे मराठा आरक्षण रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची ५० टक्के मर्यादा कोणतेही राज्य ओलांडू शकत नाही, असे स्पष्ट केल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला होता.

# ओबीसी समाजाच्या वतीने आज सांगोला बंद

**सांगोला/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

सांगोला तालुक्यातील सर्व ओबीसी प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीमध्ये सांगोला येथे मीटिंग पार पडली त्या मीटिंगमध्ये ओबीसी समाजाच्या आरक्षण बचावासाठी सांगोला तालुका आज बंद ठेवण्याचे तसेच नाझरा टोल नाका येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको करण्याचे एकमताने ठराव करण्यात आला.त्यानंतर सांगोला तहसीलदार सांगोला पोलीस स्टेशन यांना सांगोला बंदचे निवेदन देण्यात आले. सर्व व्यापारी वर्गाने ही एक मताने बंद ठेवून पाठिंबा छोटे मोठे उद्योग धंदे व्यापारी वर्ग यांनी बंद ठेवून सहकार्य करतील असा विश्र्वास व्यक्त केला.

ओबोसी आरक्षण बचावा साठी राज्य मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे हे वडीगोद्री अंबड येथे तसेच पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर श्री मंगेश ससाणे,मृणाल ढोले पाटील यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आमचा विरोध नाही परंतु ओबीसी समाजावर अन्याय करून आमच्या आरक्षणाला धक्का लावू नये. आमच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे



अशी ओबीसी समाजाकडून बोलले जात आहे. शेकाप चे नेते बाबासाहेब देशमुख, मारुती आबा बनकर, सांगोला सूतगिरणीचे चेअरमन डॉ. प्रभाकर माळी, उद्योगपती बाळासाहेब एरंडे, मा.नगरसेवक शिवाजी बनकर, मा.नगरसेवक आनंदा माने, सुरेश आदाटे,माळी महासंघाचे प्रदेश कार्याध्यक्ष सोमनाथ राऊत, सावता परिषद सोलापूर युवक जिल्हाध्यक्ष सयाजी बनसोडे,उल्हास धायगुडे पाटील, अमोल खरात, तानाजी खंडागळे, ज्ञानेश्र्वर इमडे, यशवंत सेना सांगोला तालुकाध्यक्ष आनंदा मेटकरी,सावता परिषद सांगोला तालुका अध्यक्ष संतोष टाकळे, मनसे अध्यक्ष विशाल गोडसे, दत्ता जानकर, संतोष कारंडे, सोमनाथ आदलिंगे, प्रतिक बनसोडे, समता परिषद सांगोला तालुकाध्यक्ष मधुकर माळी, समता परिषद सांगोला शहराध्यक्ष भैरवनाथ बुरांडे,महेश बनकर, नाथपंथी समाज अध्यक्ष शिवाजी इंगोले, शिवसेना नेते समाधान कोळेकर, यांचेसह अनेक समाज बांधव बांधव उपस्थित होते.

त्यावेळी जास्तीत जास्त लोकांनी रास्ता रोको आंदोलन करण्यासाठी ओबीसी समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे ओबीसी नेत्यांकडून आवाहन करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble



# अग्निशमन वाहन खड्ड्यात फसले उल्हासनगर खड्डे मुक्त कधी होईल का कुणाचा जीव जाईल

**उल्हासनगर/ बाळासाहेब अहिरे**

उल्हासनगर मध्ये रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अग्निशमन दलाची गाडी खड्ड्यात फसण्याचा समोर येत आहे अग्निशामक वाहन कॉल वरून येत असताना ही घटना घडली,

उल्हासनगर शहरात ठिकठिकाणी खड्ड्यांची दुरवस्था झाल्याचं दिसून येत आहे, उल्हासनगर मध्ये जागोजागी खड्ड्याने नागरिक हैराण झाले आहे जे अग्निशामक लोकचे जीव वाचवण्याचे सेवा करते तिचे च जीव धोक्यात आल्याचे दिसून येत आहे कॅम्प क्रमांक चार परिसरातील संभाजी चौक परिसरातील घटना आहे,

वाहन चालकाच्या प्रसंगावधानमुळे गाडी पलटी होण्यापासून वाचली, सुदैवाने कुठलीहीच जीवितहानी झाली नसून, या घटनेमुळे शहरातील खड्ड्यांचे चित्र स्पष्ट झालेल दिसत आहे.

# कर्मवीर सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

**पंढरपूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

कर्मवीर सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या गळीत हंगामाचा मिल रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक यांच्या शुभहस्ते वाई चेअरमन कैलास खुळे व कार्यकारी संचालक श्री यशवंत कुलकर्णी व संचालक व अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.यावेळी बोलताना कारखान्याची चेअरमन मा.आ. श्री प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले की कर्मवीर सुधाकर पंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे गळीत हंगाम २०२४२५ साठी सुमारे दहा १०५०० हेक्टर क्षेत्राच्या ऊस नोंदी झालेले असून त्यामध्ये आणखी पंधराशे ते दोन हजार हेक्टर क्षेत्राच्या वाढीव नोंदी होतील



असा अंदाज आहे या हंगामात कारखाना पूर्ण क्षमतेने चालणार असून यासाठी आवश्यक असणारी तोडणी व वाहतूक यंत्रणा उभारणीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे कारखाना पूर्ण क्षमतेने चालवण्याची साठी आवश्यक असणाऱ्या तोडणी व वाहतूक यंत्रणेचे काम सुरू आहे या हंगामात कारखान्याची सुमारे ४०० ते ४५० ट्रॅक्टर व दोनशे ते अडीचशे बैलगाडीची आवश्यकता असून आवश्यकतेप्रमाणे सर्व करार करण्यात आले आहेत. बोलताना कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी यांनी माहिती दिली की गणित २०२३ २४ ची कारखान्याची प्रमाणे प्रति मेट्रिक टन रक्कम २५०० रुपये असतानाही या हंगामात गाळात झालेल्या ऊसाला एफ आर पी पेक्षा रक्कम तीनशे ज्यादा देऊन प्रति टन रक्कम रुपये २८०० प्रमाणे ऊस बिल अदा केले आहे तसेच तोडणी वाहतूक ठेकेदारांसाठी बिले अदा केले आहेत पाठीमागील हंगामाच्या पाऊस कमी असल्यामुळे उन्हाळ्यामध्ये ऊस उत्पादकांना पाणीटंचाईची सामोरे जावे लागले आहे

परंतु सध्या कार्यक्षेत्रात झालेल्या समाधानकारक पावसामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे वाढणे वाढ होण्यापासून कारखान्यास अपेक्षा प्रमाणे गायब करता येणार आहे.

यावेळी कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे दिलीपराव चव्हाण ज्ञानदेव ढोबळे तानाजी वाघमोडे बाळासाहेब ग्रुप सलगर भगवान चौगुले लक्ष्मण धनवडे भास्कर कच गावडे भैरू वाघमारे गंगाराम मिळते सुदाम मोरे जिजा जाधव हनुमंत कदम किसन सर्वदे पाटील दिलीप गुरव सिताराम शिंदे शामराव साळुंखे राजू पाटील अधिकारखान्याचे अधिकारी उपस्थित होते

# ग्रामीण भागातील नागरिकांची , शेतकऱ्यांची अडवणूक करू नका, त्यांच्या अडचणी सुटण्यासाठी, त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी सहकार्य करा : खा. प्रणिती शिंदे

**❋ आचारसंहितेच्या अगोदर सोलापूर जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामे व नवीन विकासकामे मंजूर करून मार्गी लावण्याचे सूचना केल्या. ❋ खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजासंबंधीत आढावा बैठक घेतला.**



**सोलापूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

खासदार प्रणिती शिंदे यांनी आज रोजी सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध विभागांच्या कामकाजासंबंधीत आढावा बैठक घेतली.

या बैठकीत सामान्य प्रशासन, ग्रामपंचायत, कृषी विभाग, बांधकाम विभाग, लघु पाटबंधारे, समाज कल्याण, ग्रामीण पाणीपुरवठा, महिला बालकल्याण, पशुसंवर्धन, शिक्षण, आरोग्य, उमेद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ग्रामीण स्वच्छता अभियान आदी विभागाची विविध कामे इत्यादी बाबत चर्चा झाली.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी ग्रामीण भागातील नागरिकांची, शेतकऱ्यांची अडवणूक न करता त्यांच्या अडचणी सुटण्यासाठी व शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सहकार्य करावे असे अधिकारी वर्गाला उद्देशून म्हणाल्या.

तसेच यावेळी आगामी काही महिन्यात विधानसभा निवडणूक लागणार असून आचारसंहितेच्या अगोदर सोलापूर जिल्ह्यातील प्रलंबित विकासकामे व नवीन विकासकामे मंजूर करून मार्गी लावण्याच्या सूचना केल्या. यावेळी जिल्हा परिषदेचे सीईओ मनीषा आव्हाळे, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, अँड नंदकुमार पवार, सुरेश हसापुरे, सुलेमान तांबोळी, राजेश पवार, प्रशांत साळे, शालिवाहन माने, मनोज यलगुलवार, मल्लिकार्जुन पाटील, पांडुरंग जावळे, संदीप पाटील, भारत जाधव, तिरुपती परकीपंडला, निलेश जरग , सचिन गुंड अँडीशनल सीईओ संदीप कोहिनकर यांच्यासह ग्रामीण भागातील नागरिक, जिल्हा परिषदेच्या विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# स्टार प्रवाहच्या नायिका उत्साहात साजरी करणार वटपौर्णिमा

**ठरलं तर मग, लक्ष्मीच्या पाऊलांनी, घरोघरी मातीच्या चुली, साधी माणसं आणि मुरांबा मालिकेत वटपौर्णिमेचा उत्साह**

वरुण राजाचं आगमन झालं की चाहूल लागते ती वटपौर्णिमा सणाची. पती-पत्नीच्या नात्यातला गोडवा वाढवणारा हा सण स्टार प्रवाहच्या मालिकांमध्येही उत्साहात साजरा होणार आहे. महाराष्ट्राची नंबर वन मालिका अर्थातच ठरलं तर मग मध्ये यंदाची वटपौर्णिमा



खास ठरणार आहे. सायली-अर्जुनचं नातं बहरु लागलं आहे. दोघांनीही एकमेकांबरच्या प्रेमाची कबूली दिली नसली तरी मनात मात्र जन्मोजन्मी आम्हाला एकमेकांची साथ लाभू दे अशी इच्छा व्यक्त केलीय. यंदा वटपौर्णिमेची पूजा सायली तर करणारच आहे पण सायलीसोबत अर्जुनही वडाभोवती सात फेऱ्या घेऊन हे व्रत पूर्ण करणार आहे. अर्जुनने सायलीसाठी उपवासही केला आहे. अतिशय रोमॅण्टिक असा ठरलं तर मगचा वटपौर्णिमा विशेष भाग असणार आहे.

अर्जुन-सायली प्रमाणेच मुरांबा मालिकेतला अक्षयही रमासोबत वटपौर्णिमेचं व्रत करणार आहे. आरतीच्या निधनानंतर तिच्या बाळाची जबाबदारी रमाने स्वीकारली. आईच्या मायेने ती या बाळाला जीवापाड जपतेय. आईपणाच्या सगळ्या जबाबदाऱ्या नेटाने पूर्ण करण्याचा प्रयत्न करतेय. तिच्या या नव्या जबाबदारीमध्ये अक्षयही तिला मनापासून साथ देतोय. वटपौर्णिमेच्या पुजेसाठीही उसंत नसताना अक्षयने रमासाठी पुजेची सर्व तयारी केली. रमा आणि आपल्या लेकीसोबत वडाभोवती फेरे घेताना जबाबदारीही अशीच जन्मोजन्मी पूर्ण करेन हे वचन त्याने रमाला दिलंय.

लक्ष्मीच्या पाऊलांनी मधील कला, घरोघरी मातीच्या चुली मालिकेतील ऐश्वर्या आणि साधी माणसं मालिकेतील मीरा देखिल लग्नानंतरची पहिली वटपौर्णिमा साजरी करणार आहेत. सण म्हण्टलं की आनंद आणि उत्साह हा आलाच. तेव्हा सणाचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी पाहायला विसरु नका स्टार प्रवाहच्या मालिकांचे वटपौर्णिमा विशेष भाग.

**स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८**

# स्वेरीच्या स्वराली जोशी यांची 'इंटेलीपॅट' या कंपनीत निवड मिळाले वार्षिक रु. ७.२५ लाखांचे पॅकेज

**पंढरपूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

'इंटेलीपॅट' या बहुराष्ट्रीय कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील स्वराली श्रीरंग जोशी यांची कॅम्पस




प्लेसमेंटच्या माध्यमातून निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

बेंगलोर येथील 'इंटेलीपॅट' या बहुराष्ट्रीय कंपनीच्या समितीने या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागात अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या स्वराली श्रीरंग जोशी या विद्यार्थीनीची निवड केली असून त्यांना वार्षिक रु. ७.२५ लाख इतके पॅकेज मिळाले आहे. बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर स्वराली जोशी यांनी पुढील शिक्षणासाठी पंढरपूरचे स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग निवडले. अत्यंत कष्टाने शिक्षण घेऊन त्यांनी हे यश मिळविले आहे. विद्यार्थ्यांचे परिश्रम, शिक्षकांचे प्रयत्न आणि स्वेरीतील शैक्षणिक कल्चर यामुळेच स्वेरीतील विद्यार्थ्यांना अधिक प्रमाणात नोकरीच्या संधी उपलब्ध होत आहेत आणि त्यातून स्वेरीवर असलेला पालकांचा विश्वास आणखी दृढ होत आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंट साठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये स्वेरीचे विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरी मध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. त्यामध्ये ॲप्टिट्यूड, कम्युनिकेशन स्किल, एडवॉन्सड टेक्निकल ट्रेनिंग, मॉक इंटरव्ह्यू, ग्रुप डिस्कशन, सॉफ्टवेअर ट्रेनिंग या व्यतिरिक्त जागतिक स्तरावर संधी मिळण्यासाठी जापनीज लँग्वेज ट्रेनींग तसेच जीआरई, टोफेल या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील तज्ञ प्राध्यापकांचे व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विद्यार्थ्यांना नोकरीची संधी उपलब्ध होत असल्याने विशेषतः पालक वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, उपप्राचार्य डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्ह्युवमधून निवड झालेल्या स्वराली जोशी यांचे अभिनंदन केले आहे.

# प्रत्येकाने आपल्यातील कौशल्य ओळखून यशस्वी होण्याचा मार्ग निवडावा : बाबासाहेब पाटील

**नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे**

कौशल्य ,रोजगार ,उद्योजकता व नाविन्यता विभाग ,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय मुंबई ,शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तुळजापूर येथे श्री छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर



शिबिराचे आयोजन दिनांक १९ जून २०२४ रोजी तुळजाभवानी पुजारी मंगल कार्यालय तुळजापूर येथे पार पडले याप्रसंगी उद्घाटन पर कार्यक्रमात बोलताना उद्योजक तथा चेअरमन आय एम सी ऑफ आयटीआय श्री बाबासाहेब पाटील यांनी वरीप्रमाणेच आवाहन केले या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून जिल्हा व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण अधिकारी श्री प्रवीण औताडे हे उपस्थित होते याप्रसंगी श्री संजय गुरव, सहाय्यक आयुक्त ,कौशल्य रोजगार व उद्योजकता ,धाराशिव, लोहारा आयटीआयचे प्राचार्य श्री एस बी कांबळे, श्रीहरी सोळंके, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी ,धाराशिव तसेच प्रमुख मार्गदर्शक वक्ते म्हणून श्री गणेश चादरे, करिअर कौन्सेलर,टाटा सामाजिक विकास संस्था तुळजापूर , डॉ. सुयोग अमृतराव, संचालक व्यवस्थापन शास्त्र विभाग विद्यापीठ उपकेंद्र, धाराशिव ,प्रा. अमोल पवार, ïीेंðïेपरश्र ïशिरझ्शी विविध महामंडळाचे, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रतिनिधी, बँकांचे प्रतिनिधी, शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक ,विद्यार्थी महाविद्यालयीन , युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते... हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य श्री बिरादार एम. व टीम तुळजापूर यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिल्प निदेशक श्री मनोज चौधरी व किरण झरकर यांनी केले . या कार्यक्रमाचा लाभ तुळजापूर परिसरातील सातशे उमेदवारांना झाला.

# गरीब-गरजूंना शैक्षणिक साहित्य व सायकल वाटप हे कार्य कौतुकास्पद

**सोलापूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

महादेव कोगनुरे हे एक व्यक्ती म्हणून परिचित आहेत. गरीब-गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटपाचे त्यांचे कार्य हे नक्कीच कौतुकास्पद आहे. यामुळे जिल्हा परिषद शाळा सुधारण्यास मदत होईल. लोकसभा निवडणुकीत महादेव कोगनुरे यांनी ऐनवेळेस काँग्रेस पक्षात प्रवेश करुन मला साथ दिली. भविष्यात मी त्यांना नक्कीच साथ देईन असे प्रतिपादन नुतन खा. प्रणिती सुशीलकुमार शिंदे यांनी येथे बोलताना केले.सागर सिमेंट व एम के फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांच्या वतीने कर्मयोगी अप्पासाहेब काडादी सांस्कृतिक भवन सिध्देश्वर साखर कारखाना सोलापूर येथे दोन लाख वह्या वाटप व सायकल भेट कार्यक्रमाचा शुभारंभ खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी त्या बोलत होत्या.पुढे बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, तुम्ही मला खासदार म्हणून निवडून आणून एक संधी दिली आहे . या संधीचे सोनं करण्याचे काम मी नक्कीच करेन यासाठी तुमचे सदैव साथ माझ्या पाठीशी असणे गरजेचे असल्याचे सांगितले. यावेळी धर्मराज काडादी बोलताना म्हणाले की, लहान वयात महादेव कोगनुरे हे एक युवा उद्योजक म्हणून पुढे येत आहेत. शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुलांना शैक्षणिक साहित्य व मदत देऊन त्यांना शिक्षणप्रवाहात आणण्याचे महादेव कोगनुरे यांचे प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महादेव कोगनुरे म्हणाले की, सामाजिक कार्य करत असताना आज हे अनेक वेळा माझ्यावर टीका केली जाते. याकडे मी दुर्लक्ष करीत मी माझ्या सामाजिक ऋण फोडण्याचे काम प्रामाणिकपणे करत असल्याचे सांगितले. यावेळी सिध्दाराम चाकोते, अशोक देवकते आदींनी ही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले तर उपस्थितांचे आभार शिवाजी राठोड पाटील यांनी मानले.यावेळी शिवपुत्र महास्वामी, वेदमूर्ती महांतेश हिरेमठ, धर्मराज काडादी, दत्तात्रय मुळे, सागर सिमेंट चे सेल्स प्रमोटर आनंद लोणावत, सुरेश शर्मा, राधाकृष्ण पाटील, अशोक देवकते, सिध्दाराम चाकोते तसेच सागर सिमेंट चे पदाधिकारी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# आषाढी यात्रा सोहळ्यासाठी प्रशासनाचे कालबध्द नियोजन : अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर

**पंढरपूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

आषाढी शुद्ध एकादशी सोहळा १७ जुलै २०२४ रोजी होणार असून, या यात्रेसाठी पायी पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. पालखी सोहळ्यासोबत येणा-या वारकरी भाविकांना पालखी मार्गावर व तळांवर कोणतीही अडचण येऊ नये तसेच वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांना चांगल्या दर्जाच्या सेवा सुविधा पुरवल्या जातील यासाठी प्रत्येक प्रशासकीय विभागाचे कालबद्ध नियोजन तयार करण्यात आले आहे. या नियोजनानुसारच कालमर्यादेत सर्व विभागांनी समन्वय राखून काम करावे अशा सूचना अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर यांनी दिल्या.आषाढी वारी पूर्व नियोजनाबाबत श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैठकीस प्रांताधिकारी सचिन इतापे, अमित माळी, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, मदन जाधव, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका



आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक महेश सुडके, नायब तहसीलदार मनोज श्रोत्री, चंद्रकांत हेडगिरे, मंदीर समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर म्हणाल्या, आषाढी यात्रा सोहळ्यासाठी येणाऱ्या सर्वच पालखी मार्गावर व तळांवर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करावाव्यात. पालखी मार्गावर व तळांवर तात्पुरत्या शौचालयाच्या ठिकाणी मुबलक पाण्याची उपलब्धता, जादाचे स्वच्छता कर्मचारी त्याचबरोबर सेक्शन मशीन ठेवावी. शौचालये वेळोवेळी स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्रातील नियुक्त अधिकारी यांनी ज्या ठिकाणी नेमून दिले आहेत तेथील परिसराची पाहणी करून नैसर्गिक आपत्तीच्या दृष्टीकोनातून काही बदल करावयाच्या आवश्यक असल्यास तात्काळ करून घ्यावेत महावितरणने शहरातील रोहित्र, फ्युज पेटी यांना संरक्षक पॅनेल टाकावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने शहरात येणाऱ्या त्यांच्या आखातरित्या असणाऱ्या रस्त्यांची पाहणी करून आवश्यक ठिकाणी तात्काळ दुरुस्ती करावी.राज्य परिवहन महामंडळाकडून पालखी सोहळ्यासाठी चंद्रभागा, भीमा,विठ्ठल व पांडुरंग या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या बस स्थानकात मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक असतात त्या ठिकाणी आरोग्य विषयक सुविधा तात्काळ मिळाव्यात यासाठी आरोग्य सुविधा केंद्र तसेच रुग्णवाहिका यासह मुबलक पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्याची व्यवस्था करावी. आषाढी यात्रा कालावधीत चंद्रभागा नदीपात्रात पवित्र स्नानासाठी मोठ्या प्रमाणात भाविक जात असतात नदी पात्रात भाविकांच्या सुरक्षेसाठी जीवरक्षक,यांत्रिक बोटी, प्रशिक्षित पोहणारे, यांची उपलब्धता ठेवावी तसेच नदीपात्रात धोकादायक असणाऱ्या ठिकाणी फलक लावावेत अशा सूचनाही अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंग ठाकूर यांनी यावेळी दिल्या. यावेळी मुख्याधिकारी प्रशांत जाधव म्हणाले, मंदिर परिसर, प्रदक्षिणामार्ग स्टेशन रोड यासह शहरातील व अतिक्रमणे काढणे तसेच वाखरी पालखी तळावरील मुरमीकरण, झाडेझुडपे, सुलभ शौचालयांची दुरुस्ती आदीकामे ३० जून पर्यंत करण्यात येतील. शहरात व पालखी सोहळ्याबरोबर येणाऱ्या भाविकांना मुबलक प्रमाणात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व वेळोवेळी औषध फवारणी व स्वच्छता करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले

# ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांच्याकडून 'निर्मलवारी' पूर्वतयारीचा आढावा

## स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी आवश्यक नियोजन करा : गिरीष महाजन

**पुणे/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

पालखी सोहळ्यात वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासह स्वच्छ, निर्मल व सुरक्षित वारीसाठी बारकाईने नियोजन करा, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री गिरीष महाजन यांनी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित निर्मलवारी पूर्वतयारी आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, उपायुक्त समीक्षा चंद्राकार, वर्षा लड्डा-उंटवाल, विजय मुळीक, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, तसेच सातारा, सोलापूर, नाशिक व जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी (दुरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते.



मंत्री श्री. महाजन म्हणाले, यावर्षी पालखी सोहळ्यासाठी गतवर्षीपेक्षा अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. पालखी सोहळ्यासाठीची कामे पारदर्शकता ठेऊन वेळेत पूर्ण करावीत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी, पालखी मार्ग व विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल याची विशेष खबरदारी घ्यावी. स्वच्छतेसाठी पुरेशा प्रमाणात फिरती शौचालये आणि अधिक प्रमाणात स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. पंढरपूर येथे पालखी तळावर पुरेशा प्रमाणात आणि मोठ्या आकाराच्या कचराकुंड्या ठेवाव्यात.

निर्मलवारीच्या यशस्वीतेसाठी प्रत्येक जिल्ह्यातील स्वयंसेवक, सेवाभावी संस्था, एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याबाबत आवाहन करावे. पंढरपूर शहरातील वीज पुरवठा अखंडित राहील याची दक्षता घ्यावी. पिण्याच्या पाण्याचा स्रोतांच्या ठिकाणी आवश्यक असल्यास जनरेटरची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. पावसाच्या पार्श्र्वभूमीवर पालखी मुक्कामाच्या ठिकाणी चांगली व्यवस्था होईल याकडे लक्ष द्यावे.

टँकरमधील पाण्याच्या शुद्धतेबाबत नियमित तपासणी करावी. पाण्याच्या स्रोतांचे शुद्धीकरणही निटपणे होईल याकडे लक्ष देण्यासोबत त्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक करावी. जळगाव जिल्हा परिषदेने संत मुक्ताबाई पालखी सोहळ्यासोबत दोन पिण्याच्या पाण्याचे टँकर पंढरपूरपर्यंत उपलब्ध करुन द्यावेत.

पालखी मार्गावरील रेस्टॉरंट, हॉटेल्स यांची स्वच्छता व अन्न शुद्धतेची खात्री करावी. तसेच पंढरपूर शहरातील कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी वाढीव मनुष्यबळ व वाहनांची व्यवस्था करावी असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. पालखी सोहळ्यादरम्यान पिण्याचे पाणी, आरोग्य आणि स्वच्छतेसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाहीदेखील श्री.महाजन यांनी दिली.

प्रधान सचिव डवले यांनी निधी उपब्धतेबाबत माहिती दिली. पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या कामांचे कार्यादेश तातडीने देऊन कामे सुरू करावीत. पालखी सोहळ्यासंबंधातील कामे वेळेवर पूर्ण होतील यादृष्टीने नियोजन करावे, असे ते म्हणाले.

विभागीय आयुक्त श्री. पुलकुंडवार यांनी सादरीकरणाद्वारे करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली. यावर्षी फिरते शौचालय आणि स्वच्छतेसाठी मनुष्यबळ अधिक संख्येने वाढवण्यात आले आहेत. स्वच्छ आणि निर्मल वारीसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासणी, प्रथमोपचार पेट्या, निवारा केंद्र, हिरकणी कक्ष आदी सुविधांसोबत वारकऱ्यांना आरोग्य सुविधा देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.पुणे, सातारा,सोलापूर, नाशिक व जळगाव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली.

# रेशीम उद्योगास चालना देण्यासाठी शासन कटिबद्ध, सोलापुरात रेशीम कोष बाजारपेठ इमारतीचे लोकार्पण

**सोलापूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रातील नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करून पारंपारिक पिकांऐवजी कमी संसाधनात जास्तीत जास्त उत्पादन देणाऱ्या नवीन पिकांचे प्रयोग शेतात राबवावेत. तुती लागवड किंवा रेशीम उत्पादन हा एक चांगला पर्याय शेतकऱ्यांसमोर आला असून त्याकडे शेतकरी मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत. राज्य शासनही रेशीम उद्योगास चालना देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सोलापूरचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. सोलापूरजवळ रेशीम कोष बाजारपेठ अर्थात रेशीम पार्क इमारत उभारण्यात आली आहे. त्याच्या लोकार्पणाचे औचित्य साधून आयोजित रेशीम उत्पादक शेतकरी कार्यशाळेमध्ये पालकमंत्री पाटील बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आमदार सुभाष देशमुख, रेशीम उद्योग विभागाच्या उपसचिव श्रध्दा कोचरेकर, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रकाश महानवर आदी उपस्थित होते.हिरज येथील रेशीम बाजारपेठेमुळे सोलापूर जिल्ह्यासह परिसरातील अन्य जिल्ह्यातील रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना हक्काची



बाजारपेठ मिळाली असून याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळणार आहे. शासनही महारेशीम अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये तुती लागवडीबाबत जागृती करीत आहे. जिल्ह्यासह राज्यातील सर्व रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या अनुदानाच्या अनुषंगाने प्रलंबित असलेले प्रस्ताव शासन स्तरावरून त्वरित निकाली काढण्याचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. शासन खंबीरपणे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिली.जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील वातावरण डाळींब व रेशीम उत्पादनासाठी पोषक आहे. रेशीम अनुदानाचे प्रलंबित प्रस्ताव लवकर मार्गी लागण्यासाठी प्रयत्न करीत आहे. जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून आवश्यक ती सर्व मदत रेशीम उद्योगास चालना मिळण्यासाठी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनीही मनोगत मांडले. यावेळी रेशीम उद्योग पुस्तिकेचे प्रकाशन पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. रेशीम विकास अधिकारी विनित पवार यांनी प्रास्ताविक केले.

# तुंगतच्या सरपंच रणदिवे आणि आ. शिंदे यांनी स्वखर्चातून केले रस्त्याची मुरमीकरण



**पंढरपूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर तालुक्यातील माढा विधानसभा मतदारसंघातील असलेल्या तुंगत गावातील गावांतर्गत अंधभांगे वस्ती रस्त्याच्या भीषण दुरावस्थेचा मुद्दा कळीचा बनला असताना येथील लोकनियुक्त सरपंच डॉक्टर अमृता रणदिवे यांनी त्यांचे पती डॉक्टर आबासाहेब रणदिवे यांनी पुढाकार घेऊन या विधानसभा कार्यक्षेत्राचे आमदार बबनदादा शिंदे यांच्याशी पाठपुरावा केला व रस्त्याचे स्वखर्चातून यांच्याशी पाठपुरावा केला व रस्त्याचे स्वखर्चातून तयार करण्याची विनंती केली त्यानुसार आमदार बबनदादा शिंदे व डॉक्टर रणदिवे यांनी रस्त्याच्या मुरमीकरणास सुरुवात केल्याने येथील शेतकऱ्यास शालेय विद्यार्थ्यांचा प्रश्न मार्गी लागला आहे

ग्रामीण भागातील रस्त्याची झालेल्या दुरुस्तीकडे लक्ष वेधण्यासाठी तुंगत येथील डॉक्टर बाबासाहेब यांनी शालेय विद्यार्थ्यांना घेऊन आमदार बबनदादा शिंदे यांची भेट घेतली आणि मी स्वतः या रस्त्यासाठी स्वखर्चातून मुरमीकरण करण्यास तयार आहे आपणही त्यासाठी काही आपले योगदान दिल्यास या ठिकाणी असलेल्या भांगे वस्ती अंधवस्ती आणि बर्थडे वस्तीवरील शेतकरी आणि शालेय विद्यार्थ्यांना त्रास कमी होणार आहे

मागील दोन वर्षांपूर्वी जिल्हा परिषद अंतर्गत या रस्त्याचे खडीकरण करण्यात आले होते मात्र पावसाळ्यामध्ये या रस्त्याची खूपच दयने अवस्था झाल्याने परिसरातील नागरिक तसेच शालेय विद्यार्थ्यांना करताना मोठी कसरत करावी लागत होती या संदर्भातील या भागातील रहिवाशांनी वेळोवेळी डॉक्टर आबासाहेब रणदिवे यांच्याशी चर्चा केली व त्यांनीही त्यातून काहीही मार्ग काढू असे आश्र्वासन दिले होते त्यानंतर नुकतेच त्यांनी आमदार बबनदादा शिंदे यांनी भेट घेतली त्यांनी हा रस्ता तात्पुरत्या स्वरूपात मुरंबीकरण करण्यास सकारात्मकता दर्शविल्याने या रस्त्याची ताबडतोब कामकाज रणदिवे यांनी सुरू केली व भविष्यकाळात या भागाच्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून लवकरच रस्त्याची डांबरीकरण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे रणदिवे यांनी सांगितले यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुधीर आंध नवनाथ रणदिवे आमदार बबनदादा शिंदे प्रतिनिधी नवनाथ रणदिवे सर माजी ग्रामपंचायत सदस्य वामन बसावे चेअरमन अधिराज रणदिवे भैया मुलानी रहिवासी दादा भोसले धनाजी रणदिवे सुभाष भापकर गणेश रणदिवे पप्पू बनसोडे सचिन दिखरे समाधान पवार सोहम पवार यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते

# भरधाव वेगाने येणाऱ्या टेम्पो ने उल्हासनगर भाजी मार्केट येथील दुकानाचे केले नुकसान



**उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे**

उल्हासनगर २ भाजी मार्केट व मच्छी मार्केट येथे रात्रीच्या सुमारास भरधाव वेगाने टेम्पो क्रमांक चक्र५एङ६०६९ याने भाजी मार्केट मच्छी मार्केटमध्ये असलेले दुकानांना धडक दिल्याने भाजी मार्केटमधील दुकानाची नुकसान केले .आहे मात्र कुठलीही जिवीतहानी झालेली नाही .सध्या टेम्पो चालक हा फरार आहे असे सांगण्यात येत आहे पुढील तपास उल्हासनगर पोलीस अधिकारी करीत आहे

# पंढरपूर भुयारी गटार योजनेसाठी १२१ कोटी मंजूर करावेत; माजी आमदार प्रशांत परिचारक यांची मागणी

**पंढरपूर/ दैनिक यशसिध्दि न्यूज**

शहराचा होणारा विस्तार व दैनंदिन येणारे हजारो भाविक यांचा विचार करता पंढरपूरच्या चौथ्या टप्प्यातील भुयारी गटार योजनेसाठी १२१ कोटी रुपये मंजूर करावेत अशी मागणी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केली असून याबाबतचा प्रस्ताव पंढरपूर नगरपरिषदेने तयार करून शासनाकडे पाठविला आहे. महाराष्ट्रातील राज्यातील पंढरपूर अत्यंत महत्वाचे तीर्थक्षेत्रअसून श्रीविठ्ठल रूक्मिणीचे दर्शनाकरिता राज्यातील व इतर राज्यातील लाखो भाविक दरवर्षी आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री अशा चार यात्रा कालावधीत येत असतात. तर दररोज ५० हजार भाविक देखील हजेरी लावतात. तसेच पंढरपूर शहर व उपनगर विकसित होत असून वाढती लोकसंख्या पाहता भुयारी गटार क्र. ४ करणे गरजेचे आहे. पंढरपूर शहरात यापुर्वी शासनाने भुयारी गटार योजनेचे तीन टप्पे राबविले असून त्याअनुषंगाने भुयारी गटार योजना टप्पा क्र.४ साठी केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत पंढरपूर भुयारी गटार योजनासाठी १२१.६९ कोटींचा डीपीआर बनवून प्रस्ताव तांत्रिक मंजूरीकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे सादर केलेला आहे. नव्या भुयारी गटार योजना टप्पा क्र.४ मध्ये टाकळी, गणेश नगर, कासेगाव रोड परिसर, कोर्ट परिसर, इसबावी गावठाण परिसरातील कामे प्रामुख्याने होणार आहेत. परंतु मागील काही महिन्यांपासून आचारसंहिता असल्यामुळे हा प्रस्ताव रखडला होता. आता भुयारी गटार योजना टप्पा क्र. ४ साठी तातडीने राज्य स्तरीय समितीमध्ये मंजूरी द्यावी अशी मागणी प्रशांत परिचारक यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचेकडे केली आहे.

